Comments 2023

मला यात काही मुद्दे प्रस्तुत वाटतात ते असे -- अतिवास्तववादी कविता, अमूर्त वा प्रति-कविता, न-भाषा कविता -- अशी अनेक प्रकारची कविता लिहिली जाणार. त्यात सबोध व अबोध मन एकत्र येणे, सबोध मनाचा कंट्रोल अगदी कमी असणे, निरर्थकतेकडेच कल असणे -- असे प्रकार असणार. त्यांचा सलग थांग लागणे शक्य नाही. तरीही त्या कविता आशय पोचवत असतात म्हणजे काय, या अंगाने विचार व्हायला हवा.

हं -- शास्त्र वा तंत्र यांतले प्रश्न सोडून इतर प्रश्नांना बौद्धिक उत्तरे नाहीत -- असली तर ती निरुपयोगी, खोटी आणि गुंता अधिकच वाढवणारी असणार –

हडपसर शाखेत आम्ही एकत्र काम केले होते ! माझ्या या १९७० पासूनच्या मित्राच्या स्मृतीस अभिवादन !

त्यांच्या ( गो. म. कुलकर्णी )  ' रसग्रहण ' या पुस्तकात माझा एक लेख होता.

हजारो पात्रांचे जन्मदाते ! स्मृतीस अभिवादन ! ( रंगभूषाकार प्रभाकर भावे )।

खुद्द लंडनमध्ये एकदा गेलो असताना ( दारूविरहित ) असा प्रसंग माझ्यावर आला होता. ना जवळ कुठे मुतारी ना हॉटेल ! नाइलाज झाला ! एका कडेच्या, रस्त्यापासून थोड्या अंतरावरच्या झाडाखाली मी कार्यभाग उरकला ! कुणी काही पाहिले नाही त्यामुळे गुन्हा घडलाच नाही ! मग साळसूदपणे माझ्या मार्गाने निघून गेलो !

उदाहरणादाखल ही घ्या सीमिकची एक कविता ---

पहाटे चारचे आरसे ( Mirrors at 4 A. M. )
-- चार्लस सीमिक –

तुम्ही त्यांच्याकडे बाजूच्या रस्त्यांनीच या
सावल्यांच्या गुंताड्यातल्या खोल्यांकडे,
बघा त्यांच्या रिकामेपणाचे दृश्य पण
त्यांना मात्र उलट तुम्ही
ओझरतेही दिसू नयेत असे.
त्याचे रहस्य असे आहे,
एखादी रिकामी शय्याही त्यांना ओझे वाटते,
एक खोटेपणा.
ते स्वतःशी अधिक खरे असतात
कोऱ्या भिंतीच्या सहवासात,
काळ आणि अनंतता यांच्या सहवासात
जे, क्षमा करा,
त्यांची कोणतीच प्रतिमा नाही उमटवत
त्यांना स्वतःचेच कौतुक वाटत असताना आरशात,

जेव्हा तुम्ही उभे असता एका बाजूला
हातरुमाल बाहेर काढत
तुमची भुवई पुसण्यासाठी चोरटेपणाने.
--- ००० ---

माझ्या, ' एक गगनभेदी किंचाळी ' या नाटकातले अविस्मरणीय मोरेकाका ! ( चंद्रकांत कल्लोळी )

माझ्या ' ढोलताशे ' चा पहिला हीरो ! खूप शुभेच्छा ! ( अजित भुरे )

पुस्तक तर महत्त्वाचे आहेच, त्याचप्रमाणे, तुझे ते समजून घेण्याची प्रक्रिया मांडणेही ! उत्तम !
( लाख्यांच्या ' नाटक : मुक्त चिंतन ' – या पुस्तकावरची समीर दळवी यांची पोस्ट ).

--- आणि शक्य तो निरनिराळ्या बोली बोलणारी पात्रे घे -- त्यांचे सगळे संवाद त्यांच्या त्यांच्या बोलीत लिही --
जाता जाता मराठीत एक क्रांतीही करू ! ( स्वप्नील चव्हाणच्या पोस्टवर )

ती सुन्नता घालवायला नंतर टाईडच्या तीन वड्या लागल्या !

अशा काही सात्त्विक लोकांकडून मीही, पळिपंचपात्रीवाले, जानवेवाले, भिक्षुक, ब्राह्मण. आरेसेसवाले असे शब्द ऐकून घेतलेले आहेत. त्यांच्या डोक्यांतले तेच नेमके जर मला बोलता आले नाही तर त्यांचा असा उद्रेक होतो, हे माझ्या लक्षात आले. माझा त्यांना त्रास नको या सात्त्विक हेतूने मी त्यांना ब्लॉक केले.

तेवढा आवाक्याचा ऐवज नसेल तर कशाला दीर्घकविता ? की दीर्घ कविता लिहिताच मान्यता लौकर मिळते ?

कवितेतला मी म्हणजे स्वत: कवी नव्हे.

स्वत:च्या अशा घट्ट ओळखी घेऊन जगणारे लोक ' एकदिलाने ' काहीही करू शकतील ?

भयाण वास्तवाचे उकळते शब्द ! ( स्वप्नील चव्हाणची कविता )

भाषेच्या पुरात असा बिनधास्त पोहणारा कवी मराठीत असणे ही एक गहन आणि महान गोष्ट आहे !
( श्रीधर तिळवे यांची कविता )

' माश्या .. ' अशी विलास सारंगांची कथा आहे, हे कळले. मी ती कथा वाचलेली नव्हती. बागडांच्या या कथेत मात्र सारंगांचा उल्लेख आहे.
होय, सारंगांचा उल्लेख त्या कथेत आहे. तो माश्या मारणारा आणि हा न मारणारा असा काही फरक दिसतो आहे.
15-02-23.

कोणताही विचारव्यूह आदर्श मानणे म्हणजे तत्त्व.

All binaries are false ! there is nothing universal ! वगैरे -- याच्या मला समजलेल्या अर्थाने मी बोलतो आहे -- त्यांची positive मान्यता कशाला आहे, ते तुम्ही सांगा.
उत्तर आधुनिकतेप्रमाणे सत्य, वैश्विकता, चांगले-वाईट यांना आहे का मान्यता ? सगळा उथळपणाच आहे -- आहे ते साजरे करू या -- असे असेल तर कसले सत्य आणि कसले ज्ञान ?
उत्तर आधुनिकता हे अभिधान जगभर वापरले जाते -- त्याला आपण भोंगळ म्हणून काय उपयोग ? -- शिवाय, मध्यमवर्गीय असे हेटाळण्याचा इथे प्रश्नच नाही -- उत्तर-आधुनिकतेत हे आहे -- सखोल काही नसते, सगळे उथळच असते -- हे उलट खोटे आदर्श बाळगणाऱ्या मध्यमवर्गीयाला पचणारे नाही --असो -- आपल्यांत आकलन-भेद आहे -- असू द्या -- शेवट गाठायची काही गरज नाही –

याच चित्रपटातले, ' साथी न कोई मंजिल ' हेही एक अमर गाणे आहे ! ( बंबई का बाबू ).

मलाही ही शंका होतीच -- नेटवर पाहिले -- खांडबहाले शब्दकोशाने हा शब्द स्वीकारलेला आहे. किंचित सुलभीकरणाकडे माझा कल असतोच. तरीही, ठीक, दुरुस्ती करत आहे. धन्यवाद ! ( अद्यावत की अद्ययावत )

काठी न घोंगडं घेऊ द्या की रं
मला बी जत्रंला येऊ द्या की          ( पाच नाटकाकारांचा फोटो पाहून ).

( माझ्या ‘ वस्तू ‘ या नाटकावरच्या लाख्यांच्या पोस्टवर – )
हे नाटक कै. अरविंद देशपांडे महोत्सवात झाले तेव्हा सुलभा देशपांडे आणि रोहिणी हट्टंगडी आल्या होत्या. त्या दोघींनाही नाटक खूप आवडले होते.

--- आणि २४ तास झगमगीत कपडे आणि दागदागिने घालून फिरणाऱ्या बायका !

शैलीतले नावीन्य, चटपटीतपणा, चमकदारपणा हा वाचकांना चकित करतो, भुरळ पाडतो, हे ठीक आहे. पण तो भर ओसरतो आणि मग यात मूल्यात्मक असे काय आहे, हा प्रश्न समोर येतोच. माझ्या मते मर्ढेकरांबाबतही हा प्रश्न विचारला पाहिजे. सनसनाटी पवित्रा ठीक पण तो कस नाही ठरू शकत. ( नेमाड्यांबाबतच्या लाख्यांच्या पोस्टवर ).

सध्या हे -- बघू पाहू करू -- या सदरात आहे -- बघू ! ( एका प्रकाशनाला जाण्याबद्दल ).
०८-०३-२३.

मी तर सत्यकथेचा एक वारेमाप कवी होतो -- एकदोनदा तर कवितेचा आख्खा विभागच मला देण्यात आला होता ! एस एस सी झाल्या झाल्या १९६३ साली माझी ' झुंजुन गेल्या सरी ' ही कविता सत्यकथेत पहिल्यांदा आली होती.

खरे तर ही कविता, आपण सगळेच एकत्रितपणे कसे मूर्ख आहोत हे व्यक्त करते -- पण, तुम्हाला यातही भेद जाणवतात, हे विशेष आहे !
वा, छान ! यात आपण सगळेच कव्हर झालो !
तुमच्याच काय, कुठल्याही विचारसरणीचे विभ्रम इथे अप्रस्तुत आहेत हे कृपया समजून घ्यावे. तुमच्या सहिष्णुतेच्या मर्यादेत माझे लेखन कदापि बसणार नाही, हे तुम्हाला माहीत आहे. माझ्या लेखनाच्या फंदात तुम्ही पडू नये, ही नम्र विनंती. कारण, तुम्हाला आवडणारे फडतूस वैचारिक वाद घालत बसण्यात मला इंटरेस्ट नाही. यावरही तुमचे काही

हुशार वेगळे मत असेल. ते बोलत न बसता मला अनफ्रेंड केलेत तरी चालेल. मी तुच्छतावादी असल्याचे तुम्ही सुचवलेत त्या सन्मानाला मी अर्थातच शून्य किंमत देतो ! आपण एकमेकांची रजा घेणे हेच उत्तम !

जे आहे ते पाहण्याची हिंमत ! ( शर्मिष्ठा भोसले यांची कविता – ' ती कशी – '.

लॉर्ड ऑफ द फ्लाईज (देवाघरची फुले?)
Rahul Bansode
Champra Deshpande

Champra Deshpande
कादंबरीचा उत्तम परिचय !

भावनिक असो की वर्णनात्मक, वास्तव म्हणजेच आशय, अशा समजुतीतून लिहिलेली कविता ही ' चांगली ' असू शकत नाही. कोणतेही वास्तव हे भाषेप्रमाणेच कवितेचे माध्यम असते, हे पाहणे महत्त्वाचे आहे. याचाच अर्थ, आशय हा कवीच्या ' स्वभावाने ' दूषित झालेला नसतो. या पद्धतीने पाहता, वरील विवेचन योग्य वाटते.
( राहुल पुंगलिया यांच्या पोस्ट वरील कॉमेंट ).

Champra Deshpande
Sandeep Godbole हे तुम्ही जे सुलभ वास्तव म्हणताय तसे ते दिसणारे इथे फारसे कुणी नाहीत -- त्यामुळे, मी वापरलेला शब्द योग्य आहे. ही पोस्ट विदारक व्हावी हीच अपेक्षा आहे -- त्यामुळे, तुमचे वाटणे योग्यच आहे. असो.

'केमोल्ड आर्ट गॅलरी'मध्ये सुरू असलेलं चित्रकार शकुंतला कुलकर्णी यांच्या चित्रांचं प्रदर्शन, Quieter Than Silence, नुकतंच बघितलं. (३० एप्रिल २०२३ पर्यन्त ते तिथे सुरू असणार आहे.)चित्रा राजेंद्र जोशी – २९.०३.२३
या चित्रांबद्दल जे जे जाणवले ते ते उत्कटपणे व्यक्त केले आहे ! छान !

तुलनात्मक आहे पण त्यात न्यूनगंड वा अहंगंड नाही, हे लक्षात घेऊन बघ.

कविता विशिष्ट असणार -- आशय विशिष्ट असणार नाही –

Champra Deshpande
Sudheer Rasal काही लोक तर्कदुष्ट अर्थ लावूनही मते देत आहेत. कवी हा विचारशून्य असतो असे कुणीच म्हणणार नाही. अर्थ चुकीचे लावायचे आणि त्यावर सोयीस्कर मत द्यायचे, असे घडते आहे.

" धर्मांध प्रतिगामी अन् जात्यंध पुरोगामी यांचा हा आधुनिक महाराष्ट्र ही तुमची पोस्ट कदापि सहन करणार नाही ! "
( संतोष सुनील यांच्या पोस्ट वर ).

जे आहे त्याचे समग्र भान हा संदेश नसतो -- त्याला वैचारिक दिशा देणे हा संदेश असतो -- या समजुतीतून मी लिहिले आहे.
१६-०४-२३.

Padmanabh Pathak तू असे म्हणतोस पण दुसरे काही मित्र म्हणतात की स्वत:ची टिमकी वाजवायला शिका जरा, नाहीतर कुणी ढुंकून दखल नाही घेणार तुमची ! यावर मी, ' कभी हां, कभी ना ' असे करत राहतो ! त्यातही, ' लहानपण दे गा देवा ' ही रणनीतीही चांगली असते, असा माझा अनुभव आहे ! या सगळ्याचे बेमालूम बॅलन्सिंग करत चालायचा माझा प्रयत्न असतो ! पण हे प्रयत्न मी फार गांभीर्याने नाही करत !

Gautam Ainapure ते जाऊ द्या सगळे -- कदाचित देवनागरी हा शब्द तुम्हाला आवडणार नाही, पण, इलाज नाही, आपल्या लिपीत लिहायला लागा की आता ! काही वर्षे झाली तुम्हाला ही विनंती करून !

अत्यंत उत्तुंग आहे हा लेख ! ग्रेट ! मराठीत याची ताबडतोब विल्हेवाट लावायचे प्रयत्न होतील. आपल्या विचारात जे बसत नाही ते फालतू -- हे इथले प्रस्थापित सत्य आहे ! टिंगल-टवाळ्या आणि शेरेबाजी हेच या लेखाचे भवितव्य असेल. " बुध्दीवाद विवेकवाद किंवा पुरोगामीपणा वगैरेंच्या बळावर एबस्ट्रॅक्शन नाकारलं जातंय. " -- हे तुमचे वाक्य हे इथले एक गलिच्छ सत्य आहे ! इथल्या कलाक्षेत्राचे मुख्य कार्य म्हणजे सर्व सांस्कृतिक प्रवाह मातीत घालत राहणे, हे आहे. सवयीचे, रद्दड, रटाळ असे ' नवे नवे ' अभिव्यक्त करत राहणे, एवढे इथे बास आहे. -- हे असे खरे तर बोलू नये, पण, लेख खूपच आवडल्याने चुकून बोलले गेले आहे. त्यामुळे, इथेच, सॉरी म्हणून मोकळा होतो ! (रवी लाखे )

फारच चांगले परीक्षण ! मराठीत चांगले नाट्यसमीक्षक वा एकूणच समीक्षक यांबाबत एक पोकळी आहे -- ती भरून काढण्याचे काम बऱ्याच प्रमाणात तू करू शकशील ! गांभीर्याने मनावर घ्यावे ! ( काठपदर वर गिरीश पतके. )

Ramesh Aundhkar कशाबद्दल ? मुळात हा संवाद पुन्हा त्याच अटीतटीने चाललेला आहे. ही पोस्ट त्या अंगाने लिहिलेली नाही. इथे आलेल्या कोमेन्टची मी दखल घेतो म्हणजे ते मला मान्य असते असे नव्हे. त्यामुळे ' तुम्ही पण ? ' असे तुम्ही का म्हणत आहात ते कळले नाही.Ramesh Aundhkar इथे अनेक कॉमेंट मला न पटणाऱ्या आहेत -- सहभागी होणाऱ्यांकडे दुर्लक्ष केले असे होऊ नये म्हणून -- दखल घेणे या अर्थी मी लाईक करत असतो. हे मी माझ्या सर्वच पोस्टवर करतो. मुकुंद कुळे यांनी तुम्हाला असे म्हणणे किंवा कुणीही कुणालाही तर ते चर्चेचे गांभीर्य घालवणारेच आहे. मला ते मान्य नाही.एक बाजू घेऊन भांडत राहिल्यास संवाद कसा निरर्थक होत जातो हे या संवादातून कळू शकते.जगातल्या प्रत्येक समस्येवरचे उत्तर समजणारे काही लोक आहेत खरे तर -- त्यांचा प्रभाव का पडत नसावा ही आणखी एक समस्या !अनेकांच्याकडे तेल न लावलेली अनेक दगडी तत्त्वज्ञाने वा प्रणाली आहेत -- ती सर्व मिळून जगणे बरबाद करत आहेत ! की एखाद्यालाच ' सत्य ' वाटणारे आणि हाती पकडता येणारे तत्त्वज्ञान सर्वांनीच आत्मसात केले पाहिजे, असे तुम्हाला वाटते ?तथाकथित धर्माचा साचा आणि विचारसरणीचा साचा हे दोन्ही सारखेच घातक असतात -- हे सगळ्यांनाच कळावे असा विशाल आशावाद बाळगायला हवा !माझ्या वा तुमच्या कुवतीपेक्षा जास्त कुवतीचे आपण काय कसे करू शकणार ?

त्याबाबत मी दुसरी पोस्ट दिलेली आहे.
बाजू घेण्याच्या तथाकथित वैचारिक स्पष्टतेमुळेच तर माणसाच्या जगण्याची बोंब होते आहे, असे दिसले तर तेच कसे करावे ? समस्या समजून घेण्यात आपण एकत्र असू शकतो पण कुणी कुणाला बोध देऊ शकत नाही -- ही माझी स्पष्टता आहे. ( शरद पोंक्षे ).

डाव्यांना दु:खमुक्ती, निर्वाण -- हे चालेल का याची शंका वाटते !

हा उतारा ( दोन्ही अर्थांनी ) ग्रेटच ग्रेट आहे ! प्रत्येक साहित्य संमेलनाच्या प्रवेशद्वारावर हा ढळढळीतपणे लावला जायला हवा ! मराठीत डॉक्टरेट करणाऱ्या प्रत्येकाला हा उतारा पाठ करणे बंधनकारक असावे ! ( राहुल पुंगलिया )

माफ करा, हा लेख वर्णनात्मक आणि मोघम झाला आहे. त्यांच्या एखाद्या कलाकृतीच्या आशयाचा ' मोठेपणा ' म्हणजे काय होते ? एखादा वैचारिक साचा की अधिक खोलातले आकलन ? बाहेर ते काहीही बोलत-वागत असोत, जगण्यातल्या आध्यात्मिक समस्यांचेही त्यांना भान होते. ते नुसतेच ' विचारी ' नाटककार नव्हते, असे वाटते.
( दीपक बोरगावे ).

कोणत्याही काळाला संबोधित करणे यासाठी कला असते असे मला दिसत नाही. कोणत्या तरी काळाचा माल तीत असतो, इतकेच.काळाला संबोधित करतच नाही म्हटल्यावर 22 व्या शतकाचा संबंधच येत नाही. मुळात आजचा काळही प्रत्येकाचा वेगळा असतो, हे वर आलेलेच आहे. असो. मतभेद तर असणार.माफ करा, तुम्ही म्हणता तेच अशक्य आहे -- माझी पोस्ट तुम्ही नीट वाचलेली नाही. आजचा काळ असे काही नसतेच, असे मी मांडले आहे. प्रत्येक माणसाचा काळ वेगळा असतो. काळ म्हणजे घड्याळ नव्हे --मानसिक काळ. प्रत्येक माणसाचा मानसिक काळ वेगळा असतो -- एकाचा 2023 चा, एकाचा 1947 चा असे म्हणता येत नाही. ढोबळपणे मांडायचे झाल्यास, जातवादी पुरोगाम्याचा काळ वेगळा, जाती-अंतवादी पुरोगाम्याचा वेगळा, हिंदुत्ववाद्याचा वेगळा, मुसलमानाचा वा कम्युनिस्टाचा वेगळा -- असे असते. कलावंत एखाद्या भ्रामक, काल्पनिक काळाला संबोधित करत नाही. तो एकूण माणसाला संबोधित करतो. त्याचे माध्यम हे त्याचा काळ असते. त्यामुळे माझा वा तुमचा मानसिक काळ सालनिहाय सांगणे हे भ्रामक असते. ( सुनील तांबे ).

चि. श्रेया ही माझी नात आहे. तिला चित्रकलेची आवड असल्याने अशा ठिकाणी ती माझ्याबरोबर येत असते. धन्यवाद, प्रकाशजी !

मूर्षा नव्हे, तो शब्द मृषा आहे.

Champra Deshpande
मी बऱ्याच वर्षांपूर्वी ' अभिनय ' हा लेख लिहिला होता -- त्यातला, इथे प्रस्तुत असणारा काही भाग --
अशा या पार्श्वभूमीवर आता एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. अतीव दु:खाचा असा प्रसंग सादर करायचा असेल -- त्यात रडायचे असेल -- तर स्वत:च्या व्यक्तिगत जीवनातला एखादा तत्सम अनुभव आठवून रडावे का ? यावर कुणी असेही म्हणेल की एखादा नट तंत्र कसेही का वापरेना, त्याचा अभिनय कसा होतोय तेवढेच आपण पाहावे. ते पाहू, पण यात कायकाय घडेल ते पाहायचे टाळायचेही कारण नाही. याचा अर्थ असा होतो की एखाद्या नटाची आई वारलेली असेल आणि त्यावेळी त्याला खूप रडण्याइतक्या दु:खाचा अनुभव आला असेल तर तो अनुभव, हा नट, अभिनय चांगला होण्यासाठी वारंवार वापरत राहील ! आणि हा त्याचा अभिनय समजून प्रेक्षक त्याला दाद देत राहतील ! दु:ख विस्मृतीत जावे या निसर्गक्रमाच्या विरुध्द तर हे होईलच पण शिवाय ही प्रेक्षकांची घोर फसवणूक होईल. आपण याच्या खऱ्या
दु:खाला ' वाह् ' म्हणालो हे प्रेक्षकांना कळाले तर ?
हाच प्रश्न जरा वेगळ्या प्रकारे पाहू. अमिताभ बच्चन सुपरस्टार होण्याच्या अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण हे आहे की त्याने अतिशय हाय-होल्टेज अभिनय केला. गरज पडेल तेव्हा भावनिक तीव्रता तो फारच प्रचंड वाढवू शकला -- जे दुसऱ्या कुठल्या नटाला जमले नाही. मग, असे सीन्स करताना तो कुठल्या आठवणी काढत असेल ?

त्याच्या लहानपणी तो असा वागला असेल ? असे असते तर त्याच्या वडिलांना एवढ्या कविता लिहिता आल्या असत्या ?
दु:खाचेच उदाहरण पुढे चालवायचे झाले तर पात्रापात्रागणिक दु:खाच्या तऱ्हा वेगवेगळ्या असतात. एखाद्या वैयक्तित दु:खाच्या त्याच त्या आठवणीवर विसंबून -- असे हे अनेक बारकावे -- सूक्ष्म छटा दाखवणे शक्य होईल ?
लेखक जेव्हा असे प्रसंग लिहितो तेव्हा तो काय करतो ? पात्रांचे वेगळेपण तो स्वत:च्या वैयक्तिक अनुभवाच्या चाकोरीत फिट करून टाकतो ? तसे असेल तर मग नटाच्या अनुभवाच्या वैयक्तिक चाकोरीतून ते कसे व्यक्त होऊ शकणार ? ' असाध्य ते साध्य ' असा हा प्रकार आहे ?
याचे उत्तर अर्थातच ' नाही ' हेच असणार आहे. लेखक असो, नट असो, जगण्याच्या ओघात आलेली ' अनुभवांची समज ' वापरत असतात. प्रत्यक्ष वैयक्तिक अनुभव नव्हे ! आणि ज्याअर्थी एका सीनमधले दु:ख व्यक्त करण्यासाठी कुठलेतरी वैयक्तिक दु:ख वापरता येते याचा अर्थच सगळे दु:ख एकच असते. कोणत्याही दु:खाची समज आली असेल तर इतर कुठलेही दु:ख समजू शकते. दु:ख ही एक निरनिराळ्या कारणांनी निर्माण होणारी मन:स्थिती असते असे म्हणता येईल. अपमानाचे दु:ख आणि आई वारण्याचे दु:ख ही मूलत: वेगळी नसतात. ही ' समज ' असल्यावर वेगवेगळ्या प्रकारचे दु:खही व्यक्त होऊ शकेल. लेखकाचे आत्मचरित्रात्मक नाटक असले तरी नटाच्या बाबतीत हेच खरे असेल. एका एका प्रसंगाला एकाएका प्रसंगाची आठवण हा अभिनयाचा खोटा, अकलात्मक, विकृत प्रकार असून 'समज' व्यक्त होणे हेच अपेक्षित आहे. खऱ्याखोट्यात सतत हेलकावत -- फाटत राहण्याची काहीही आवश्यकता नाही. असल्या तंत्रामुळे अभिनय कसदार होणार नाही. त्यातली सहजता, उत्स्फूतर्ता हरवून जाईल. आणि याहूनही सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे नटाच्या स्वत:च्या जगण्याला ही पध्दत हानिकारक ठरेल. ज्या गोष्टी विस्मृतीत जाव्यात असा निसर्गक्रम आहे त्या गोष्टी सतत ताज्या ठेवल्या जातील. जखमा भरून येणार नाहीत.

हे रोमँटिक की माझाच मार्ग बरोबर म्हणणारे रोमँटिक ?

ग्रेट नाट्यपरीक्षण ! हे सखोल लेखन ही एक कलाकृतीच आहे ! ( पुनश्च हरी ओम  वर गिरीश पतके ).

आपल्या मनाचे कंडिशनिंग हा सर्जकतेला अडथळा असतो -- हा त्याचा अर्थ आहे -- त्यातून येणारे सर्व प्रयासयुक्त असते -- आणि मलाही तो अर्थ मान्य आहे. तालमी घ्याव्या लागणे, नेपथ्य उभारावे लागणे -- या मेहनतीचा हा विषय नाही. ती लागणारच.कलावंत जगत येतो, वाचतो, पाहतो, अभ्यास करतो -- ही मेहनत असतेच ना ! तुमचा नेमका आक्षेप काय आहे ते सांगा ना --त्या वाक्याचे पुस्तक आणि पान क्रमांक माझ्याकडे नाही आहे -- ते लक्षात राहिलेले वाक्य आहे -- ते माझेच धरून चालायला हरकत नाही. ते चुकीचे आहे असे काहींना वाटू शकते. त्याला इलाज नाही.
व्यक्तीच्या कंडिशनिंगमधून होणारी कृती ही सहेतुक, व्यक्तीच्या विचारांनी, मतांनी दिशा दिलेली असते -- सर्जकतेत ही मर्यादा नसते -- हे जगात अनेकांनी वेगवेगळ्या शब्दांत म्हटलेले आहे. तरीही काहींचे आकलन तसे नसल्याने त्यांना ते निरर्थक, चुकलेले वाटू शकते. त्याच्यापुढे चर्चेने एकमेकांना काहीच पटवणे शक्य नसते. कंडिशनिंगची कृती ही ताणयुक्त म्हणून सप्रयास असते. अमुक चुकले आहे असे तुम्ही कितीही स्पष्टपणे म्हटले तरी आपण कुणीही अशा बाबतीत ऑथॉरिटी असू शकत नाही. मी मांडतो आहे तेच बरोबर वा सत्य असा माझा कधीही दावा नसतो. असो. जाऊ द्या -- होऊ शकते असे -- थोडी चर्चा झाली पण हाती काही लागले नाही -- मी काही क्लियर करायचा प्रयत्न केला पण कुणाला काही पटवून द्यायची जबाबदारी मी कधी घेत नाही. असो. रामराम ! ( आभास आनंद ).

मी शंकर वैद्यांचा विद्यार्थी. अनेकदा मी त्यांच्या माटुंगा इथल्या ' आफ्रिका हाऊस ' मधल्या निवासस्थानी गेलो होतो. डॉ. सरोजिनी वैद्य या त्यांच्या पत्नी. त्यांनीच मला आकाशवाणीवरच्या एका विद्यार्थी कार्यक्रमात कविता वाचनासाठी

नेले होते. त्यांच्या घरी एकदा मी जेवलोही होतो. त्यांच्या घरी झालेल्या अनेक गप्पा या समृद्ध करणाऱ्या होत्या. त्यांच्या स्मृतीस अभिवादन !

मौल्यवान कथांचे समतोल परीक्षण ! ( रज्जूत मज्जा वरचे लाख्यांचे समीक्षण ).
20-06-23.